# पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण, यांचे कार्यालय,

चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे - 411 008
दुरध्वनी क्रमांक 020-25657878 फॅक्स क्र. 020-25674641
ई मेल - sp.pune.r @mahapolice.gov.in


जा.क्र. पशा-8/टेनिस कोर्टस व उपहारगृह-निवीदा/2024/ पुणे, दि. 30/12/2024.

## सुचना - टेनिस कोर्ट्स व उपहारगृह भाडेतत्वावर देणेबाबत.

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे 411008या जिल्हा पोलीस घटकाचा "पोलीस कल्याण निधी" वृद्धींगत करण्यासाठी, जिल्हा पोलीस मुख्यालयाचे आवारातील मुख्य इमारतीचे मागील बाजूस असलेले सिंगल्स लाईन - हार्डकोट - 2 टेनिसकोर्ट्स व उपहारगृह 11 महिन्याचे करारा प्रमाणे आवश्यक त्या अटी व शर्तीनुसार उच्चतम बोलीदारास भाडेतत्वावर द्यावयाचे आहे. त्याबाबतच्या अटी व शर्ती पुणे ग्रामीण जिल्हा पोलीस दलाचे संकेतस्थळावर (https://puneruralpolice.gov.in/Tenders ) येथे उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

तरी, इच्छुक ठेकेदार / संस्थाचालक यांनी स्वतंत्रपणे मोहोरबंद (sealed) दरपत्रक / निवीदा लिफाफे त्यावर "टेनिस कोर्ट भाडेतत्वावर मिळणेसाठी" व " उपहारगृह भाडेतत्वावर मिळणेसाठी" असे स्पष्ट ठळक अक्षरात नमूद करून **पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे 411008** यांचे नावाने पोलीस निरीक्षक, कल्याण शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे ग्रामीण येथे कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी 10.00 ते सायंकाळी 06.00 या वेळेत दि.06.01.2025 पासून ते दि.10.01.2025 पर्यंत जमा करावेत. सदरची दरपत्रके दि.13.01.2025 रोजी उघडण्यात येतील.

**दरपत्रके खाली नमूद नमुन्याप्रमाणे स्वतंत्रपणे सादर करावीत.**

| तपशील | वापर | रक्कम रुपये (मासिक/दरमहा) |
|---|---|---|
| सिंगल्स लाईन - हार्डकोट - 2 टेनिसकोर्ट्स | केवळ टेनिस कोर्ट साठी | रु. |
| भाडेतत्वावर उपहारगृह चालविणेबाबत | खाद्यपदार्थ बनविणे/विक्री करणे | रु. |

**अधिक माहितीसाठी संपर्क :-**
श्री. नवनाथ मदने, पोलीस निरीक्षक, कल्याण शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण.
दूरध्वनी क्रमांक :- 8975997171
दिनांक: 27/12/2024
ठिकाण: पुणे.

(पंकज देशमुख ) भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण

CamScanner

पुणे ग्रामीण जिल्हा पोलीस दलाचा पोलीस कल्याण निधी वृद्धींगत करण्यासाठी पोलीस मुख्यालयाचे आवारातील मुख्य इमारतीचे मागील बाजूस असलेले सिंगल्स लाईन - हार्डकोट - 2 टेनिसकोर्ट्स भाडेतत्वावर देणे बाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे.

---

## अटी व शर्ती

1. सदर टेनिसकोर्ट्स प्रक्रियेकरीता करिता शुल्क रक्कम रु. 3,400/- (अक्षरी रूपये तीन हजार चारशे फक्त ) पोलीस कल्याण निधी रोखपाल, लेखा शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण यांचेकडे धनादेश / रोखीने कार्यालयीन वेळेत अगाऊ भरणा करावी लागेल. सदरची रक्कम विनापरतावा असेल. सदरची रक्कम भरणा केलेबाबतच्या पावतीची छायांकित प्रत दरपत्रके जमा करताना जोडणे अनिवार्य आहे. त्याशिवाय आपणाकडून नोंदविण्यात येणाऱ्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.
2. बोलीदारांकडून कोणत्याही कारणास्तव सदर मुदतीनंतर प्राप्त होणारी तसेच सशर्त नमूद केलेली दरपत्रके रद्द ठरविली जातील.
3. सदर टेनिसकोर्ट्स फक्त टेनिस खेळासाठी वापरण्यात येईल. त्याव्यतिरीक्त इतर कोणत्याही खेळासाठी किंवा कार्यक्रमासाठी वापरता येणार नाही. तसेच टेनिस कोर्टच्या आवारात पुर्वपरवानगी शिवाय कुठल्याही प्रकारचे बांधकाम अथवा बदल करता येणार नाहीत.
4. सदर टेनिसकोर्ट्स वापराचा कालावधी 11 महिन्याच्या मुदतीनंतर संपेल. तथापी, मुदत संपल्यानंतर पुढील मुदत वाढवून देण्याचा व नवीन करारपत्र तयार करणेबाबतचा अथवा रद्द करण्याचा निर्णय पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांना राहील.
5. सदर टेनिसकोर्ट्स पोलीस विभागाची असल्याने, पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या सुचनेनुसार केव्हाही पोलीस विभागासाठी वापरण्यात येईल. तसेच आवश्यकता भासेल त्यावेळी टेनिसकोर्ट्सचा ताबा व्यक्ती / संस्थेकडून काढून घेण्यात येईल.
6. पोलीस मैदानाचा - पोलीस भरती प्रक्रियेदरम्यान अथवा इतर कोणत्याही शासकीय कार्यक्रमादरम्यान विहित कालावधीसाठी वापर करता येणार नाही. याबाबत कार्यालयाकडून आपणास पुर्वसुचना देणे बंधनकारक असणार नाही. या कार्यालयाकडून टेनिसकोर्ट्स वापराचे संबंधित कालावधीतील भाडे क्षमापित करण्यात येईल.
7. सदर टेनिसकोर्ट्स येथे येणाऱ्यांना प्रशिक्षण देणेची जबाबदारी संबंधित व्यक्ती/संस्थाचालक यांचेवर राहील.
8. खेळासाठी लागणारे सर्व ते आवश्यक साहित्य संबंधित ठेकेदार/व्यक्ती/संस्थाचालकांनी स्वतःचे वापरावयाचे आहे.
9. टेनिस कोर्ट वर "Tennis Ball Machin" संबंधित ठेकेदार/व्यक्ती/संस्थाचालकांनी ठेवणे बंधनकारक आहे.
10. टेनिस कोर्ट वर विद्युत पुरवठा उपलब्ध असून, त्याकरीता असलेल्या स्वतंत्र मिटरचे देयक दरमहा संबंधित ठेकेदार/व्यक्ती/संस्थाचालकांनी भरावे लागेल.
11. सदर टेनिस कोर्टमध्ये कोणताही गैरप्रकार किंवा बेशिस्त वर्तन होणार नाही याची यशस्वी बोलीदार / संस्थेने खबरदारी घ्यावी. टेनिस कोर्टच्या परिसरात खेळाडू अथवा इतर कोणाबरोबरही भांडण तंटा व इतर कुठल्याही प्रकारचा गुन्हा घडल्यास संबधित यशस्वी बोलीदार / संस्था त्यास सर्वस्वी जबाबदार राहील व सदर संस्थेस / यशस्वी बोलीदारास कायदेशिर बाबींना सामोरे जावे लागेल.
12. सदर टेनिस कोर्ट वापरावरती पोलीस निरीक्षक, कल्याण शाखा, पुणे ग्रा. यांची देखरेख राहील. टेनिसकोर्ट्सचे वापराबाबत असलेल्या कोणत्याही अडचणींबाबत त्यांचेशी सल्लामसलत करता येईल.
13. टेनिसकोर्ट्स वापरताना इतर कोणत्याही सोई सुविधा आवश्यक असल्यास पोलीस निरीक्षक कल्याण शाखा यांचे मार्फतीने आपल्या मागण्या नोंदविण्यात याव्यात. ग्राह्य मागण्यांच्या पुर्ततेसंबंधी विचार करण्यात येईल.

CamScanner

14. टेनिस कोर्ट चालविणारी संस्था व खेळावयास येणारे खेळाडू यांनी त्यांची चार /दोन चाकी वाहने कार्यालयाचे आवारातील पार्कींगमध्ये शिस्तीत वाहने लावणे आवश्यक राहील.
15. टेनिसकोर्ट्स वापरताना झालेल्या मोडतोड, नुकसानीची संबंधित यशस्वी बोलीदारांनी स्वत:हून भरपाई देणे आवश्यक राहील. तसेच करार संपुष्टात येताना मैदानाचे / जागेचे काही नुकसान झाल्याचे आढळून आल्यास त्याची नुकसान भरपाई संबंधित यशस्वी बोलीदार / संस्थेकडून त्यांनी जमा केलेल्या अनामत रक्कमेतून वसुली केली जाणार असून अशी रक्कम वसूल करताना बोलीदाराची कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.
16. सदर प्रकरणी उच्चतम बोलीदार यांचेशी केलेल्या मासिक भाडेकराराच्या रक्कमेच्या 3 पट रक्कम अनामत म्हणून कार्यारंभ आदेश दिलेनंतर 15 दिवसात रोखपाल, पोलीस कल्याण निधी, लेखा शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण यांचेकडे धनादेशाद्वारे कार्यालयीन वेळेत जमा करावी लागेल. सदरची रक्कम भरावयास विलंब झाल्यास त्यापुढील प्रत्येक दिवसाला **रू. 500/- विनापरतावा** दंडनिय शुल्क आकारण्यात येईल.
17. टेनिसकोर्ट येथील देखभाल दुरूस्ती खर्च संबंधित ठेकेदार/व्यक्ती/संस्थाचालकांनी करावयाचा आहे.
18. पुणे ग्रामीण जिल्हा पोलीस दलाच्या अस्थापनेवरील इच्छुक असलेल्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांचे पाल्य/कुटुंबियांकरिता तसेच पुणे ग्रामीण जिल्हा पोलीस दलातील पोलीस अधिकारी / अंमलदार व्यतिरिक्त इतर पोलीस अधिकारी व अंमलदारांकरिता टेनिस कोर्टचे **मोफत प्रशिक्षण** देणे आवश्यक आहे. त्याची स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक राहील.
19. यशस्वी बोलीदार / संस्थेकडून टेनिकोर्ट्स करार संपुष्टात आणून करार रद्द करावयाचा असल्यास त्यांनी 1 महिना अगोदर लेखी स्वरुपात पुर्व सुचना देणे बंधनकारक राहील. अन्यथा एक महिन्याचे मासिक भाडे अनामत रक्कमेतून कपात करून अनामत रक्कम परत करण्यात येईल.

**( पंकज देशमुख )** भा.पो.से.
**पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण.**

पुणे ग्रामीण जिल्हा पोलीस दलाचा पोलीस कल्याण निधी वृद्धींगत करण्यासाठी पोलीस मुख्यालयाचे आवारातील मुख्य इमारतीचे मागील बाजूस असलेले **उपहारगृह** भाडेतत्वावर देणे बाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे.

---

## अटी व शर्ती

1. सदर उपहारगृह भाडेतत्वावर देण्याच्या प्रक्रियेकरीता करिता शुल्क रक्कम रु. 3,400/- (अक्षरी रूपये **तीन हजार चारशे** फक्त ) पोलीस कल्याण निधी रोखपाल, लेखा शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण यांचेकडे धनादेश / रोखीने कार्यालयीन वेळेत अगाऊ भरणा करावी लागेल. सदरची **रक्कम विनापरतावा असेल.** सदरची रक्कम भरणा केलेबाबतच्या पावतीची छायांकित प्रत दरपत्रके जमा करताना जोडणे अनिवार्य आहे. त्याशिवाय आपणाकडून नोंदविण्यात येणाऱ्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.
2. बोलीदारांकडून कोणत्याही कारणास्तव दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त होणारी तसेच सशर्त नमूद केलेली दरपत्रके रद्द ठरविली जातील.
3. यापूर्वी हॉटेल/उपहारगृह इ. चालविणेबाबतचा अनुभव असल्यास त्याप्रमाणे सक्षम पुरावा दर्शविणारा अभिलेख कागदपत्रांमध्ये सामिल करावा.
4. सद्यस्थितीत हॉटेल/उपहारगृह चालवित असल्यास त्याबाबत मागील 3 वर्षांतील ITR. व तत्सम कागदपत्रे सादर करावीत.
5. सदर उपहारगृहाच्या आवारात पुर्वपरवानगी शिवाय कुठल्याही प्रकारचे बांधकाम अथवा बदल करता येणार नाहीत.
6. सदर उपहारगृहाच्या वापराचा कालावधी 11 महिन्याच्या मुदतीनंतर संपेल. तथापी, मुदत संपल्यानंतर पुढील मुदत वाढवून देण्याचा व नवीन करारपत्र तयार करणेबाबतचा अथवा रद्द करण्याचा निर्णय पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांना राहील.
7. सदर उपहारगृह पोलीस विभागाचे असल्याने, पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या सुचनेनुसार केव्हाही पोलीस विभागासाठी वापरण्यात येईल. तसेच आवश्यकता भासेल त्यावेळी उपहारगृहाचा ताबा पुर्वसुचनेशिवाय व्यक्ती / संस्थेकडून काढून घेण्यात येईल.
8. सदर उपहारगृहामध्ये कोणताही गैरप्रकार किंवा बेशिस्त वर्तन होणार नाही याची यशस्वी बोलीदार / संस्थेने खबरदारी घ्यावी. उपहारगृहाच्या परिसरात कोणाबरोबरही भांडण तंटा व इतर कुठल्याही प्रकारचा गुन्हा घडल्यास संबधित यशस्वी बोलीदार / संस्था त्यास सर्वस्वी जबाबदार राहील व सदर संस्थेस / यशस्वी बोलीदारास कायदेशिर बाबींना सामोरे जावे लागेल.
9. सदर उपहारगृहाच्या वापरावरती पोलीस निरीक्षक, कल्याण शाखा, पुणे ग्रा. यांची देखरेख राहील. उपहारगृहाच्या वापराबाबत असलेल्या कोणत्याही अडचणींबाबत त्यांचेशी सल्लामसलत करता येईल.
10. उपहारगृह वापरताना इतर कोणत्याही सोई सुविधा आवश्यक असल्यास पोलीस निरीक्षक कल्याण शाखा यांचे मार्फतीने आपल्या मागण्या नोंदविण्यात याव्यात. ग्राह्य मागण्यांच्या पुर्ततेसंबंधी विचार करण्यात येईल.
11. उपहारगृहाचे प्रत्येक महिन्याचे भाडे कार्यारंभ आदेश दिलेल्या दिनांकाप्रमाणे दर महिन्याला रोखपाल पोलीस कल्याण निधी लेखा शाखा, पुणे ग्रामीण यांचे कडे आगाऊ जमा करावे लागेल.
12. उपहारगृहाचे दरमहा विद्युत देयक उपहारगृह चालकाने स्वतः भरणा करणे आवश्यक राहील.
13. उपहारगृह वापरताना झालेल्या मोडतोड, नुकसानीची संबंधित यशस्वी बोलीदारांनी स्वतःहून भरपाई देणे आवश्यक राहील. तसेच करार संपुष्टात येताना उपहारगृहाचे काही नुकसान झाल्याचे आढळून आल्यास त्याची नुकसान भरपाई संबंधित यशस्वी बोलीदार / संस्थेकडून त्यांनी जमा केलेल्या अनामत रक्कमेतून वसुली केली जाणार असून अशी रक्कम वसूल करताना बोलीदासची कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

14. सदर प्रकरणी उच्चतम बोलीदार यांचेशी केलेल्या मासिक भाडेकराराच्या रक्कमेच्या 3 पट रक्कम अनामत म्हणून कार्यारंभ आदेश दिलेनंतर 15 दिवसात रोखपाल, पोलीस कल्याण निधी, लेखा शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण यांचेकडे धनादेशाद्वारे कार्यालयीन वेळेत जमा करावी लागेल. सदरची रक्कम भरावयास विलंब झाल्यास त्यापुढील प्रत्येक दिवसाला रू. 500/- विनापरतावा दंडनिय शुल्क आकारण्यात येईल.
15. उपहारगृह देखभाल दुरूस्ती खर्च संबंधित ठेकेदार/व्यक्ती/संस्थाचालकांनी करावयाचा आहे.
16. उपहारगृहामध्ये आवश्यकतेप्रमाणे आग प्रतिबंधक उपकरणे ठेकेदार/व्यक्ती/संस्थाचालकांनी लावणे आवश्यक राहील.
17. पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालयामध्ये चहा, कॉफी, नाश्ता व जेवण पुरविण्याची व्यवस्था असावी. उपहारगृह चालक व सेवक यांची ग्राहकांशी वर्तणूक सौदाहार्याची ठेवणे गरजेचे राहील.
18. उपहारगृहामध्ये कामासाठी ठेवण्यात येणारे कामगार हे अल्पवयीन नसावेत.
19. उपहारगृहातील सर्व पदार्थांचा दर्जा उत्तम असावा. उपहारगृहात वैविध्यपुर्ण पदार्थ ठेवणे अनिवार्य आहे. उपहारगृह फक्त रविवारी बंद ठेवता येईल. परंतु आवश्यकतेनुसार कार्यालयाकडून चालु ठेवणेबाबत कळविल्यानंतर रविवारी सुध्दा उपहारगृह सुरू ठेवावे लागेल.
20. उपहारगृहामध्ये वापरण्यात येणा-या सामुग्रीमध्ये कोणत्याही प्रकारची भेसळ नसावी.
21. उपहारगृहात पुरविण्यात येणाऱ्या खाद्य पदार्थ अथवा व्यवस्थेबद्दल तक्रार आल्यास परिणामी उपहारगृहाचा करार कोणत्याही क्षणी रद्द करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील.
22. उपहागृह व परिसर नेहमी स्वच्छ ठेवावा. ओला कचरा व सांडपाणी यांचा व्यवस्थित निचरा करावा. अस्वच्छतेमुळे पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचे आरोग्य बिघडणार नाही याची काळजी घेणे उपहारगृह चालकांची जबाबदारी असेल.
23. उपहारगृहामध्ये ठेवण्यात येणाऱ्या पेय, थंड पेय, खाद्य पदार्थ इत्यादींचे दरपत्र उपहारगृहामध्ये दर्शनी भागावर लावणे आवश्यक असेल. सदर दरांमध्ये पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे परवानगी शिवाय कोणतेही बदल करता येणार नाहीत.
24. या कार्यालयाकडून उपहारगृह चालविणे करीता उपहारगृहामध्ये असलेले सर्व साहित्य, करार संपल्यानंतर सुस्थितीत कार्यालयास परत देण्याची जबाबदारी यशस्वी निविदाकार यांची राहील.
25. करार काळात पोलीस उपहारगृहासाठी लागणारा दुरुस्तीचा खर्च उपहारगृहचालकाने स्वत: करावा लागेल.
26. उपहारगृहासाठी आवश्यक असणारे व्यावसायिक परवाना / स्वास्थ्य परवाना / अन्न व औषध प्रशासन विभाग इ. संबधित कार्यालयाकडून प्राप्त करून घेण्याची जबाबदारी उपहारगृह चालकाची राहील.
27. सदरचे उपहारगृह बंद करावयाचे असल्यास लिहून देणार यांनी 1 महिना अगोदर लेखी स्वरुपात पुर्व सुचना देणे बंधनकारक राहील. तत्पुर्वी उपहारगृह बंद केल्यास अनामत रक्कमेतून पुढील एक महिन्याचे भाडे कपात करून अनामत रक्कम परत करण्यात येईल.

(पंकज देशमुख) भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण.

CamScanner